1.”संतांनी महाराष्ट्रातीस समाज नेभळट बनवला” असे मत गं.बा. सरदार यांच्या संतसाहित्यावरील लेखनापूर्वी कोणी मांडले होते ?

अ) डॉ.श्री.व्यं केतकर

ब) न.र.फाटक

क) इतिहासाचार्य राजवाडे

ड) विष्णूशास्त्री चिपळूणकर

2. बौद्धधर्म जर भारतात टिकला असता तर भारतीय पौराणिकतेमध्ये कोणत्या गोष्टींना महत्त्व प्राप्त झाले असते बाबुराव बागुल म्हणतात ?

अ) सत्य आणि अहिंसा

ब) प्रेम आणि करूणा

क) अस्तेय आणि अपरिग्रह

ड) दया आणि शांती

3. गं.बा. सरदार यांच्या मते संत साहित्याकडे कशा नजरेने पाहणे आवश्यक आहे ?

अ)आत्मनिष्ठ नजरेने

ब) विज्ञानवादी नजरेने

क) चिकित्सक नजरेने

ड) वस्तुनिष्ठ नजरेने

4. चातुर्वर्ण्य पद्धत ऋग्वेदातील कोणत्या सुक्तात सांगितली गेली आहे ?

अ) स्त्रीसुक्त

ब) मनुस्मृती

क) पुरूषसुक्त

ड) कर्मविपाक सिद्धांत

5. म.भि.चिटणिसांनी लिहिलेले दलितांच्या चळवळीचा इतिहास मांडणारे नाटक कोणते आहे ?

अ) युगयात्रा

ब) तृतीय रत्न

क)थांबा रामराज्य येतंय

ड)काळोखाच्या गर्भात

6.'जाता नाही जात' या नाटकामधील प्राध्यापक कशासाठी एकत्र आले आहेत ?

अ) परीक्षेच्या कामांसाठी

ब) स्नेहसंमेलनासाठी

क) उद्बोधन वर्गासाठी

ड) सहलीसाठी

7. पगारे वसतीगृहाच्या खोलीत घाईने येऊन काय मिळवतो ?

अ) चांगली खोली

ब) खुर्ची

क) खिडकी

ड) कॉट

8. कांबळे आणि पगारे यांच्यात संघर्ष निर्माण करून देण्याचा डावपेच कोण आखते ?

अ)डॉ.जोशी

ब) खोपकर

क) गुंडुराव

ड) शरद पाटील

9. जोशी, खोपकर, पाटील कांबळेच्या कोणत्या कामांत व्यत्यय आणतात ?

अ) भिंतीवर डॉ. आंबेडकरांची तसबीर लावण्याचे काम

ब) प्रोजेक्ट तयार करण्याचे काम

क) पुजेत

ड) शिकवणे

10. खालीलपैकी कोणते वैशिष्ट्य गावगाड्यात दिसत नाही ?

अ) शेती  व निसर्ग

ब) पारंपरिक व्यवसाय

क) श्रेणीव्यवस्था

ड)यांत्रिक शेती

11.ऐसे कुणबी  भूपाळ' या कादंबरीतून कोणते आशयसूत्र व्यक्त झाले आहे ?

अ) ज्ञातीतील तणाव

ब) शेतमजुरांचे शोषण

क) भाऊबंदकीमुळे शेतीची झालेली वाताहत

ड) यंत्राच्या आगमनामुळे झालेली शेतक-याची शोकांतिका

12. विश्वनाथ जमिन आणि घर घेण्यासाठी कोणाला पैसे देतो ?

अ) चंद्री

ब) आशी

क) पुष्पा

ड) सुनंदा

13. कापूस विकून आलेले पैसे विश्वनाथ कोठे वापरतो ?

अ)कर्ज सोडण्यासाठी

ब)शेतीसाठी

क)निवडणुकीसाठी

ड)समाजकार्यासाठी

14. दलितांच्या चळवळीला संपूर्ण पाठिंबा देणारे महाराष्ट्रातील संस्थानिक कोण होते ?

अ) सयाजीराव गायकवाड

ब) मल्हारराव होळकर

क) शाहू महाराज

ड) माधवराव शिंदे

15.चार्वाकाच्या पंथाचे नाव काय होते ?

अ) महायान

ब) हीनयान

क) लोकायत

ड) श्वेतांबर

16. कोणत्या मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना एकत्र आणून सत्याग्रह केला ?

अ) पंढरपूरचे विठ्ठलमंदीर

ब) खंडोबाचे मंदीर

क) काळाराम मंदीर

ड) गणपती मंदीर

17.डॉ.आंबेडकरांनी दलितांना उच्चशिक्षण मिळावे यासाठी मुंबईत सुरू केलेले महाविद्यालय कोणते ?

अ) विल्सन महाविद्यालय

ब) एलफिन्सटन महाविद्यालय

क) महाराष्ट्र महाविद्यालय

ड) सिद्धार्थ महाविद्यालय

18.भि.शि.शिंदे यांनी लिहिलेले दलित रंगभूमीवरील नाटक कोणते ?

अ) तण माजोरी

ब) गांधी- आंबेडकर

क) काळोखाच्या गर्भात

ड) वाटा-पळवाटा

19.सिद्धार्थ तांबे यांना 'जाता नाही जात' या नाटकातून काय सुचीत करायचे आहे ?

अ) जात अमर व्हावी

ब) जात नष्ट झाली नाही तर देशाच्या प्रगतीला खिळ बसेल

क) आंतरजातीय विवाह झाले पाहिजेत

ड) साम्यवाद स्वीकारला पाहिजे

20. नाना गुरूजी "काषायवस्त्रधारीने सनातन हिंदू धर्म हलवला" असे बोलून कोणाबद्दलचा राग व्यक्त करतात ?

अ) चक्रधर स्वामी

ब) ख्रिस्ती धर्मीय

क) बौद्ध धर्मीय

ड) ज्यू धर्मीय

21खालीलपैकी कोणत्या लेखकाच्या कादंबरीत आदर्श ग्रामजीवनाचे चित्रण केलेले आहे ?

अ) बा.सी.मर्ढेकर

ब) उद्धव शेळके

क) वि.स.खांडेकर

ड) व्यंकटेश माडगूळकर

22. खालीलपैकी कोणत्या कादंबरीत आधुनिकीकरण आणि पारंपरिक जीवनसरणी यांच्यातील संघर्षाचे वास्तव चित्रिकरण केले आहे ?

अ) पाचोळा

ब) इंधन

क) चक्र

ड) तणकट

23. मोडकळीस आलेल्या कृषीसंस्कृतीमागील कोणते कारण 'ऐसे कुणबी भूपाळ' या कादंबरीतून निदर्शनास येत नाही ?

अ) सत्तेचा माज

ब) कष्टाचा अभाव

क) भोगवादी वृत्ती

ड) शेतीचे यांत्रिकीकरण

24. काशिनाथ आणि विश्वनाथ यांच्या हाणामारीत कोणाचा मृत्यू होतो ?

अ)पुष्पा

ब) सुनंदा

क) द्वारकाबाई

ड) विश्वनाथ

25. हाता तोंडाशी आलेला सरपंचपदाचा घास विश्वनाथला कोणामुळे गमावावा लागला ?

अ) काशिनाथ

ब)अशोक

क) गंगाआबा

ड) श्रीपती

26. स्वातंत्र्य चळवळीत कोणत्या दोन भूमिकांमुळे समाजात पडलेली फुट नुकसानकारक ठरली असे बाबुराव बागुल यांना वाटते ?

अ) दलितांचे स्वातंत्र्य विरूद्ध ग्रामीणांचे स्वातंत्र्य

ब)राजकीय सुधारणा विरूद्ध सामाजिक सुधारणा

क) दलितांचे स्वातंत्र्य विरूद्ध स्त्रियांचे स्वातंत्र्य

ड) धार्मिक सुधारणा विरूद्ध वैज्ञानिक सुधारणा

27. भारताला स्वातंत्र्य मिळूनही कोणते प्रश्न अजूनही सुटलेले नाहीत याची खंत बाबुराव बागुल व्यक्त करतात ?

अ) आर्थिक प्रश्न

ब) वैद्यकीय प्रश्न

क) वैज्ञानिक प्रश्न

ड) सामाजिक प्रश्न

28. 'साक्षीपुरम', 'बामणवाडा' ही दलित रंगभूमीवरील नाटके लिहिणारा नाटककार कोण ?

अ) संजय पवार

ब) सिद्धार्थ तांबे

क) रामनाथ चव्हाण

ड) दत्ता भगत

29. 'आयडीयल स्टेटच्या हद्दीबाहेरून' हा काव्यसंग्रह कोणी लिहिला आहे ?

अ) अरूण काळे

ब) किसन फागुजी बनसोडे

क) सिद्धार्थ तांबे

ड) नामदेव ढसाळ

30. अण्णाभाऊ साठे यांनी खालीलपैकी कोणती कादंबरी लिहिली आहे ?

अ)शितू

ब) फकिरा

क) गारंबीचा बापू

ड) बनगरवाडी

31ट्रॅक्टरच्या आगमनाने ग्रामीण शेतमजुराची झालेली दयनीय परिस्थिती कोणत्या कादंबरीत दिसते ?

अ)आई आहे शेतात

ब) पिराजी पाटील

क) गोतावळा

ड) माझा गाव

32ऐसी कुणबी भूपाळ या कादंबरीतील जमिनदारी वृत्तीचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्तिरेखा कोणती ते ओळखा.

अ) विश्वनाथ देशमुख

ब) काशिनाथ देशमुख

क) बाळाजी पाटील

ड) श्रीपती पाटील

33. 'ये रे माझ्या मागल्या' ही म्हण 'ऐसे कुणबी भूपाळ' या कादंबरीतील कोणत्या व्यक्तीला लागू होते ?

अ)सखाराम

ब) विश्वनाथ

क)काशिनाथ

ड)द्वारकाबाई

34. विश्वनाथ आणि काशिनाथ यांच्यातील संघर्ष कशासाठी आहे ?

अ) घरासाठी

ब)सत्तेसाठी

क)तत्वांसाठी

ड) गावच्या भल्यासाठी

35.गावगाडा या ग्रंथाचे लेखक कोण आहेत ?

अ) गंगाधर गाडगीळ

ब) आचार्यअत्रे

क)त्रिं.ना. आत्रे

ड) महात्मा फुले

३६.कार्तिकी या कादंबरीचे लेखक कोण आहेत ?

अ) र.वा.दिघे

ब).गो.नी.दांडोकर

क)रणजित देसाई

ड) पुरूषात्तम बोरकर

३७.स्वतंत्र भारतातील कोणत्या पंतप्रधानाने जय जवान जय किसान अशी घोषणा दिली होती ?

अ) जवाहरलाल नेहरू

ब) इंदिरा गांधी

क) नरेंद्र मोदी

ड) लालबहादुर शास्त्री

३८.महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे नेतृत्व कोणी केले?

अ) मेधा पाटकर

ब) शरद जोशी

क) शरद पवार

ड) एकनाथ खडसे

३९. समकालीन शेतकऱ्यांची सर्वात मोठी समस्य कोणती आहे ?

अ) हमीभाव न मिळणे

ब) शेतमालाची विक्री दलालांमार्फत होणे

क) नैसर्गिक अस्थिरता

ड) अनुदान न मिळणे

४०. ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’ ही कादंबरी कोणी लिहिली आहे?

अ) रंगनाथ पठारे

ब) आनंद विंगकर

क) आनंद नाडकर्णी

ड) शंकरराव खरात

४१.दलितांनी धर्मांतर करावे असे डॉ.आंबेडकरांना का वाटले ?

अ) दलितांना राजकीय हक्क मिळूनही सन्मान मिळत नव्हता

ब) बौद्ध धर्माने डॉ. आंबेडकरांना आमंत्रीत केले होते

क) दलितांना घेऊन देशांतर करणे शक्य नव्हते

ड) नामांतराचा दलितांना फायदा मिळत नव्हता

४२. 'ब्रोकन मेन' हा काव्यसंग्रह कोणी लिहिला आहे?

अ) दया पवार

ब) त्र्यंबक सपकाळे

क) केशव मेश्राम

ड) सुशिलकुमार शिंदे

४३.'जाता नाही जात' या नाटकाच्या अखेरीस गुंडुराव कांबळेंना कोणता प्रश्न विचारतो?

अ) तुम्ही कोणत्या गावचे

ब) तुम्ही कोणता विषय शिकवता

क) तुम्ही कोणत्या विचारसरणीचे

ड) तुमची जात काय

४४.पगारेने सतत 'जय भीम' म्हणणे कांबळेला का आवडतनाही

अ) कारण त्यामुळे डॉ.आंबेडकरांचा अपमान होतो

ब) कारण त्यामुळे आपण केवळ जातीचे भांडवल करतो

क) कारण त्यामुळे आपला न्यूनगंड दिसतो

ड) कारण त्यामुळे जातीची अस्मिता जागवली जाते

४५.'जाता नाही जात' या नाटकाचा शेवट काय सुचवतो ?

अ) गुंडुराव सुधारणार नाही

ब) कांबळेचे म्हणणे सगळ्यांना पटले

क) पगारेला कांबळे मित्र वाटू लागले

ड) जातीभेद संपलेला नाही

४६.दलित साहित्य हे प्रामुख्याने कोणते विचार मांडते ?

अ) क्रांतीचे

ब) मानवतेचे

क) जातीयतेचे

ड) धर्मांतराचे

४७.व्याज ग्रामीण कविता खालीलपैकी कोणी लिहिल्या ?

अ) र.वा.दिघे

ब) कवी गिरीश

क) बा.भ.बोरक

ड) कुसुमाग्रज

४८. दलितांची समस्या मांडूनही दलित रंगभूमीवरील नाटक न ठरलेले विजय तेंडुलकर यांचे नाटक कोणते ?

अ) सखाराम बाईंडर

ब) कन्यादान

क) शांतता कोर्ट चालू आहे

ड) किरवंत

४९.दलितेतरांचे दलितांबद्दलचे साहित्य दलित साहित्य म्हणून का ओळखले जात नाही ?

अ) कारण दलित जाणीव केवळ जातीने मिळते

ब) दलितांची वेदना व्यक्त होत नाही

क) दलितेतर विद्रोही लिहू शकत नाहीत

ड) दलितेतरांना बोलीभाषा येत नाही

५०.डॉ.आंबेडकरांनी दलितांना आपले म्हणणे खुलेपणाने मांडता यावे यासाठी कोणते नियतकालिक सुरू केले ?

अ) जनता

ब) प्रबुद्ध भारत

क) मूकनायक

ड) सुधारक

------------------------------------------------------------------------------------------------------------